## ई-निविदांतर्गत खुली बी-१ निविदा सुचना क्र.०१/ २०२६-२७ (दुसरी वेळ)

## ग्रामपंचायत वाघळवाडी,ता.बारामती,जि.पुणे

ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच,ग्रामपंचायत अधिकारी वाघळवाडी,ता.बारामती,जि.पुणे रा यांच्या तर्फे खालील कामाच्या नावासमोर नमूद केलेप्रमाणे ग्रामविकास विभाग/जिल्हा परिषद पुणे यांचेकडील पंजीकरण केलेल्या किंवा पंजीकारणाचा प्रस्ताव सदर केलेल्या योग्य त्या वर्गातील पत्र नोंदणीकृत कंत्राटदार,जि.प.नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील ई-निविदा मागवण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | ई-निविदा इसारा रक्कम रु. | ई –निविदा रक्कम रु. | कंत्राटदार नोंदणीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मौजे वाघळवाडी येथील हरणाई वस्ती येथे भूमिगत गटरकरणे, ता.बारामती, जि.पुणे (अनु.जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे सन – २०२४-२५ ) | ९,९९,९९६/- | १०,०००/- | २००/- | जि.प.पुणे.सर्वसाधारण खुल्या वर्गा करिता राखीव |

### निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

उपरोक्त कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये खालील नमूद केलेल्या निविदाकारांस निविदा प्रक्रियेत सहभागी होता येईल.

अ) ग्रामविकास विभाग /जिल्हा परिषद पुणे यांच्याकडे पंजीकरण केलेले नोंदणीकृत कंत्राटदार

अथवा

आ) ग्रामविकास विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार, परंतु ज्यांनी जिल्हा परिषद पुणे /ग्रामविकास विभागाकडे पंजीकरणाबाबत प्रस्ताव सदर केला आहे व त्याबाबतची विहित नमुन्यातील पोहोच घेतलेली आहे असे कंत्राटदार यांना सहभाग घेता येईल.परंतु अशी विहित नमुन्यातील घेतलेली पोहोच ग्रामविकास विभाग पंजीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्रासह निविदा ऑनलाईन भरतेवेळी अपलोड करणे बंधनकारक राहील व त्याच्याच निविदा ग्राह्य मानल्या जातील.

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल.सदर निविदेत नोटीस प्रसिद्धी,सुचना शुद्धीपत्रके इत्यादीची माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२. वरील कामाचे निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देनेत आली आहे.**सदर निविदा प्रपत्रे ,अटी,शर्ती इ.सदर संकेत स्थळावरुन दि.१२/०६/२०२६ रोजी सायंकाळी ०३.०० वाजले पासून ते दि. १९/०६/२०२६ रोजी सायंकाळी ०३.०० वाजेपर्यंत** अधिग्रहित (Download) व ऑनलाईन पद्धतीने सादर करता येईल.

३. **महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक दि.१९/०८/२०१७ अन्वये निविदाधारकांनी निविदा देकार सादर करताना दि.०१ जुलै २०१७ ला लागू झालेला वस्तू व सेवा कर कायदा (जी.एस.टी.) व इतर प्रचलित सर्व करांचा विचार करून निविदा देकार सादर करावयाचा आहेत**

**तांत्रिक लिफाफा क्र.१**

अ) प्रत्येक कामाचे निविदा प्रपत्र डाउनलोड केल्याची फी/बयाना/इसारा रक्कम निविदा सुचना रकाना क्र.४ व ५ नुसारच्या रकमे प्रमाणे कामनिहाय Online e-payment पद्धतीने जमा करणे बंधनकारक आहे.बयाना रक्कम सुट प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.तसेच सु.बे.अ. व म.स.स. यांनी त्यांचे गटातील राखीव कामे वगळता खुल्या वर्गातील निविदा भरताना बयाना रक्कम भरने बंधनकारक आहे.

आ) कंत्राटदार नोदणी प्रमाणपत्र स्कॅन करून अपलोड करावे लागेल.

इ) प्राप्तीकर पॅनकार्ड प्रत तसेच फक्त सर्वसाधारण गटातील कामांसाठी मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र (Assesment Year 2022-23, 2023-24,2024-25) स्कॅन करुन अपलोड करणे बंधनकारक आहे.

ई) जी.एस.टी. प्रमाणपत्र अपलोड करावे लागेल.

उ) उपरोक्त रक्कम रुपये ३० लक्ष वरील कामासाठी कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (बीड कपं सिटी) सनदी लेखापाल चेकडून प्रमाणित करुन सादर करावे.(With UDIN No)

(बीड कपॅसिटी): (ओ एन २) बी

थे ओ. गेल्या ५ (पाच) वर्षातील जास्तीत जास्त वाधीक उलाढाल (चालू दराने)

एन- देय कामाचा कालावधी

बी - हातातील कामांची किंमती (देय कामांच्या कालावधीतील)

ऊ) उपरोक्त रक्कम रुपये ३० लक्ष वरील कामासाठी सनदी लेखपाल यांचेकडील मागील ५ वर्षातील कंत्राटदाराची कमाल उलाढाल निविदेतील रुपये कामाच्या वार्षिक किंमतीच्या कमीत कमी ७५% टक्के इतकी असल्याबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. (With UDIN No)

वार्षीक किंमत = (कामाची एकुण किंमत)
(कामाचा कालावधी वर्षात)

ऋ) खुल्या प्रवर्गातील कामांसाठी PTR Certificate (FORM I-A) व PTE Certificate (Form II-A) सादर करणे बंधनकारक आहे.

ऌ) सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना १५ लक्ष वरील सर्व कामांसाठी शासकिय/निमशासकिय/शासन मान्य संस्थेकडील १५ लक्ष रुपये किमतीचे किमान एक काम (One single work) पूर्ण केलेले असावे. त्या बाबतचे संबंधीत कार्यालयाने दिलेले मुळ प्रमाणपत्र (work done certificate) सादर करणे आवश्यक आहे.

ऍ) निवीदेतील खुल्या प्रवर्गातील कामांसाठी निवीदांकारांनी शासकिय /निमशासकिय/शासन मान्य संस्थेकडिल उपरोक्त समान प्रकारचे काम (similar type work) प्रस्तावित कामाच्या 30% रकमेचे किमान एक काम (One single work) मागील पाच वर्षात (सन 2019-20 ते 2023-24) पुर्ण केलेले असावे. त्या बाबतचे संबंधीत कार्यालयाने दिलेले मुळ प्रमाणपत्र (work done certificate) सादर करणे आवश्यक आहे.सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रति स्कॅन करून अपलोड कराव्यात,सत्यप्रत किंवा साक्षांकित प्रत ग्राह्य धरली जाणार नाहीत,कागदपत्राच्या मूळ प्रति अपलोड न केल्यास निविदा अवैध ठरविण्यात येईल व लिफाफा क्र.२(आर्थिक लिफाफा) उघड्नेत येणार नाही यांची नोंद घ्यावी.तसेच कोणतीही कागदपत्रे अपलोड करणेस मुदत वाढ अथवा सवलत दिली जाणार नाही.

ऐ) शासकीय नियमाप्रमाणे कपात केली जाणारी रक्कम खालील प्रमाणे

१. इन्कमटॅक्स – २%
२. जी.एस.टी – शासकीय नियमानुसार
३. इन्शुरन्स - १%
४. शेष – १%
५. रॉयल्टी – शासकीय नियामनुसार
**६. दिनांक :- ०१/०७/२०१७ पासून जी.एस.टी. कर चालू झाल्यामुळे प्रचलित जी.एस.टी. कराचे शासकीय नियमानुसार कार्यवाही करणेत येईल.**

२) व्यापारी लिफाफा –

अ) ई-निविदे सोबत जोडलेल्या BOQ File मध्ये निविदा धारकाचे नाव व दर नमूद करावा.

आ) निविदाधारकाचा देकार निविदा कामच्या किमतीपेक्षा १०% पेक्षा अधिक दराने कमी असेल तर एवढ्या कमी दारात कामाचा दर्जा योग्य राखून काम कसे पूर्ण करणार याबाबतचा सविस्तर लेखी तपशील स्वाक्षरीसह लिफाफा क्रमांक.२ मध्ये विहित ठिकाणी स्कॅन करून सादर करावा अन्यथा निविदा अवैध समजनेत येईल.

इ) निविदा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्ष्या १% पर्यंत कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी भरण्याची आवश्यकता नाही.

ई) निविदा धारकाच्या देकार निविदाधीन कामाच्या किंमती पेक्षा १.०१% पासून ते १०% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदाराने निविदाधीन कामाच्या किंमतीच्या १% एवढ्या रकमेचा ग्रामपंचायत वाघळवाडी येथे देय असलेल्या ग्रामपंचायत वाघळवाडी ता. बारामती जि.पुणे या नावाने काढलेला डी.डी. निविदा प्रसिद्धीच्या दिनांका नंतरच्या तारखेचा एकत्रीत धनाकर्ष (डी.डी) (Demand Draft) जो लघुत्तम निविदा धारक असेल त्यानेच निविदा उघडलेपासून ८ दिवसाचे आत कार्यालयात जमा करावा.

उ) निविदाधारकाच्या देकार कामाच्या किंमतीपेक्षा 10% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार 10% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे तेवढ्या रकमेचा वरील (ऐ) प्रमाणे येणाऱ्या रकमेसह ग्रामपंचायत वाघळवाडी येथे देय असलेल्या ग्रामपंचायत वाघळवाडी ता. बारामती जि.पुणे या नावाने काढलेला डी.डी. निविदा प्रसिद्धीचे दिनांकानंतरच्या तारखेचा एकत्रित धनाकर्ष (डी.डी) (Demand Draft) जो लघुत्तम निविदा धारक असेल त्यानेच निविदा उघडल्या पासून ८ दिवसाचे आत कार्यालयात जमा करावा. (उदा. १०% पर्यंत कमी दर १% व (१०% ते १५% पर्यंत कमी दराने प्रती टक्का १%) ५% असे एकूण ६% रक्कम)

ऊ) निविदा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% पेक्षा कमी दराच्या असल्यास देकार १५% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे त्याच्या दोन पटीने वरील (ऑ) प्रमाणे येणाऱ्या रकमेसह ग्रामपंचायत वाघळवाडी येथे देय असलेला ग्रामपंचायत वाघळवाडी ता. बारामती जि.पुणे या या नावाने काढलेला निविदा प्रसिद्धीचे दिनांकानंतरच्या तारखेचा एकत्रित धनाकर्ष

(डी.डी) (Demand Draft) लघुत्तम निविदा धारक असेल त्यानेच निविदा उघडल्या पासून ८ दिवसाचे आत कार्यालयात जमा करावा. (उदा. १५% पर्यंत कमी एकून ६% रक्कम) व १९% पर्यंत कमी दर (१९% १५%) ४% २ = ८%) असे एकुण १४% रक्कम.

ऋ) व्यापारी लिफाफा क्र.2 उघडल्यानंतर फक्त जो निविदाधारक लघुत्तम निविदाधारक ठरेल त्यानेच धनाकर्ष (Demand Draft) कार्यालयास तात्काळ (८ दिवसांच्या आत) जमा करावयाचा आहे. तसेच लघुत्तम निविदाधारकाने धनाकर्ष ८ दिवसांत कार्यालयात जमा न केल्यास व निविदा कार्यवाहीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास कसूर केलेने प्रचलित नियमानुसार संबंधित लघुत्तम निवेदा धारकाची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच जिल्हापरिषदे कडील सर्व विभागांकडून कोणत्याही निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास प्रतिबंध केला जाईल याची नोंद घ्यावी. तसेच प्रथम न्यूनतम देकाराच्या (L-1) निविदाकाराने वरील मुदतील Additional Performance Security Deposit चा भरणा केला नाही तर द्वितीय न्यूनतम देकाराच्या (L-2) निविदाकारास लेखी विचारणा करावी व L-2 निविदाकार L-1 पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करावी. त्यानंतर निवेदेबाबत कार्यालय घेईल तो निर्णय निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

ऌ) निविदा प्रक्रिया संपूर्ण संगणकीकृत असल्याने ई-प्रणालीद्वारे निविदा उघडण्याचा मेसेज ऑनलाईन येतो, तो पाहण्याची जबाबदारी निविदाधारकाचे असून त्याबाबत स्वतंत्र कोणताही पत्रव्यवहार अथवा भ्रमणध्वनीवर कळवले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४. निविदा प्रक्रियेत कोणत्याही टप्यावर अथवा निविदा मंजुरीनंतर कामाचे कोणत्याही टप्प्यांवर कागदपत्राच्या विधीग्रह्यातेबाबत आक्षेप नोंदविला गेल्यास सदरची बाब कायदेशीर /फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.त्यास जि.प.च्या काळ्या यादीत सामाविष्ठ करणेत येईल व जि.प. च्या सर्व विभागाकडील कोणत्याही निविदा प्रक्रियेत भाग घेनेस प्रतिबंध केला जाईल याची नोंद घ्यावी.

**५. ऑनलाईन पद्धतीने सदर केलेला लिफाफा क्र.१(तांत्रिक लिफाफा) शक्यतो दिनांक २०/०६/२०२६ सायंकाळी ०३.०० वाजेपर्यंत किंवा त्यानंतर कार्यालयीन सोयीच्या वेळी http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत वाघळवाडी,ता-बारामती,जि.पुणे यांचे कार्यालयात उघड्नेत येईल.**

**६. कार्यारंभ आदेशाबरोबर करारनामा ५०० रु. स्टॅम्प पेपर वरती ७ दिवसाच्या आत करून घेणे अन्यथा टेंडर रद्द करून जि.प.च्या काळया यादीत समाविष्ट करून शासकीय नियमाप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.**

७. पात्र निविदाधारकाचा दराचा लिफाफा क्र.२ उघड्नेत दिनांक व वेल संबधित ठेकेदाराला ई-मेल द्वारे कळवली जाईल.

८. पात्र निविदा धारकाकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम हि कामाचा करारनामा करतेवेळी ग्रामपंचायत –वाघळवाडी ता.बारामती,जि.पुणे. यांचे नावे ठेव पावती स्वरुपात चलने रोख स्वरुपात घेतली जाईल व उर्वरित अनामत रक्कम प्रथम देयकातून कपात केली जाईल.

९. निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना,शुद्धिपत्रक अथवा इतर माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

१०. निविदा प्रपत्रातील व नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांवर बंधनकारक राहतील तसेच प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असून निविदा भरणाऱ्या कोणत्याही ठेकेदाराला निविदा फेताल्याबाबत स्पष्टीकरण मागवता येणार नाही.

सही------------
सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत वाघळवाडी, ता.बारामती
जि.पुणे

Signature Not Verified

Digitally signed by Hemant Vilas Gaikwad
Date: 2026.05.12 10:45:51 IST
Location: Maharashtra-MH